महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा
जिल्हा क्षयरोगअधिकारी
जिल्हा क्षयरोगकेंद्र, १४"कृष्णाबिल्डिंग" सी.पी.आर.
आवार, दसराचौक, कोल्हापूर-४१६००२

| | |
|---|---|
| (कार्यालय दुरध्वनी) 0231 - 2644193<br>(रुग्णालय दुरध्वनी) 0231 - 2644155 | कार्यालय ई-मेल- dtomhklp@rntcp.org, dto.kolhapur-mh@mah.gov.in |
| "टीबी हारेगा देश जीतेगा" | जा.क्र.जिक्षकेको/Mahatma Gandhiji Statue Notice/ 1651 /२५<br>दिनांक-15/12/२०२५ |

आरोग्य सेवा,

वाचले :- कोल्हापूर जिल्हयामधील पात्र टीबी मुक्त पंचायतींचा गौरव करणेसाठी खरेदी करणेत येणा-या महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेच्या खरेदीकरीता ई दरपत्रके मागविणेस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मंजूर टिपणणी

## जाहीर नोटीस

सुचित करण्यात येते कि, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी, कोल्हापूर कार्यक्षेत्रामधील टीबी मुक्त पंचायत यांचा सन्मान करणेसाठी खालिल प्रमाणे खरेदी करणेचे ठरवीले आहे. इच्छुकांनी सदरचे अवलोकन करावे. सदर दरपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे htpp://arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् करणेत येत आहेत. सर्वकर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटर हेडवर खालिल तपशिलाप्रमाणे सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर **" टीबी मुक्त पंचायत महात्मा गांधीजी यांची प्रतिमा ई दरपत्रक "** असा स्पष्ट उल्लेख करावा.

| अ.क्र. | साहीत्याचा तपशिल | तपशिल | दर सर्व करासहित |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजी यांची Stone Plaster ची प्रतिमा (**टीबी मुक्त पंचायत अभियान** २०२५) या घोष वाक्यासहित. | 9" Size | |

दरपत्रकाकरीता नियोजित कालावधी व वेळ

| अ.नं. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | मोहरबंद दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | १५/१२/२०२५ ते २१/१२/२०२५ (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेमध्ये) |
| २ | दरपत्रक उघडणे व मुल्यांकन | दि. २२/१२/२०२५ सकाळी ११ वाजता |
| ३ | दरपत्रक सादर करावयाचा पत्ता | जिल्हा क्षयरोग केंद्र, छ.शा.म.शा.वै. महाविद्यालय, शेंडा पार्क आवार कोल्हापूर-४१६०१२ |

**दरपत्रके सादर करणेबाबतच्या सूचना :-**

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच सेवा खरेदी प्राधिका-यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "दरपत्रकाराचे हमी पत्र" विहीत प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) छापिल दरपत्रक संस्थेच्या छापिल लेटरहेडवर सही व शिक्क्यासह सादर करावे, त्यावर GST क्रमांक नमूद करुन सोबत Shop Act License, GST प्रमाणपत्र (GST पात्र लागू नसलेस तसे सीए चे सर्टीफीकेट सोबत जोडणे आवश्यक) व PAN Card प्रत सादर करण्यात यावे.
३) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.
४) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.
५) विहीत नमुन्यात सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
६) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
७) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येईल.
८) दरपत्रकातील दर हे सद्यस्थितीत लागू असलेल्या करांसहित असावेत तसेच बाजारभावापेक्षा जास्त नसावेत [
९) प्रशासकीय अथवा तांत्रिक कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब / उशिर झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.
१०) अनुदानाच्या उपलब्धतेनुसार आवश्यक साहित्य संख्येत बदल होऊ शकतील.
११) कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर याना राहील.
१२) पुरवठादाराने साहित्य स्वखर्चाने पोहोच करणे व चिकटवणेचे आहेत.

दरपत्रक बाबतच्या माहितीसाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा.

- वेबसाईट :- http://arogya.maharashtra.gov.in
- दूरध्वनी क्रमांक :- ०२३१ - २६४४१९३

(डॉ.हर्षला वेदक)
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर

दरपत्रकारांनी दयावयाच्या हमीपत्राचा नमुना

# प्रपत्र – अ

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्थेचा काळया यादीमध्ये समाविष्ट नाही.

दिनांक :-

दरपत्रकाराची सही व संस्थेचा शिक्का